# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २७/०७/२०२३ (गुरूवार)

..............................................................................................

## विनयभंग करणा—या आरोपीविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— अंतर्गत तेलगाव तह कळमश्वेर येथे, फिर्यादी व आरोपी एकाच मोहल्ल्यात राहत असुन फिर्यादीचे घराला लागुन आरोपीचे घर असुन तो परीवारासह राहतो. आरोपी हा दारू पिण्याचा सवईचा असुन फिर्यादीला नेहमी शिवीगाळ करीत असतो. दिनांक २५.०७.२३ चे २०.०० वा दर. फिर्यादी हे घराचे काम करीत असता, आरोपी अशोक केचे फिर्यादीचे घराचे मागच्या दारातुन घरात आला. व फिर्यादीचा जबरदस्तीने हात पकडुन ओढताण करून विनयभंग केला. नंतर काही वेळाने आरोपी व त्याचा मुलगा रोशन केचे फिर्यादीचे घरासमोर आले व दोघांनी फिर्यादीला व फिर्यादीचे पतीला शिवीगाळ करून फिर्यादीचे मुलीला गायब करतो व पतीचा मर्डर करतो. अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी पिडीता फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोस्टे कळमेश्वर येथे आरोपी नामे— १. अशोक केचे २. रोशन केचे दोन्ही रा तेलगाव कळमेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ४५२,३५४,३५४ (अ),५०४,५०६,३४ भादवी अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास स फौ/ सुनिल मिश्रा मोक्र ९९२३१२३३९७ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन कुही** :— अंतर्गत मौजा कुही टावुन पांडेगाव रोड ०१ किमी पुर्व, येथे दिनांक २६.७.२३ चे १९.३० वा दरम्यान, यातील मृतक ही आठवडी बाजारातुन बाजार घेवुन घरी पायी जात असता मागुन येणा—या अज्ञात पांढ—या रंगाचे चारचाकी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन मृतकास मागुन धडक दिल्याने मृतक नामे— सत्यशिला देवेंद्रजी येळणे वय ५५ वर्ष रा वार्ड क्र ४ कुही याचे मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— राहुल मधुकर येळणे वय ३१ वर्ष रा एकविरा नगर, पांडेगाव रोड ता कुही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम ३७९, ३०४अ, भादवि सहकलम १८४,१३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री ठमके पोस्टे कुही हे करीत आहे.